# प्रसिध्दीपत्रक

१. लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट-ब अराजपत्रित) आणि लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट-ब अराजपत्रित) या पदांसाठी किमान ४५ टक्के गुण प्राप्त उमेदवारांची लघुलेखनाची चाचणी परीक्षा दिनांक १३.०८.२०२५ व दिनांक १४.०८.२०२५ रोजी **Net Quiz Assessment Solution, 700-703, 2nd Floor, Shah's Building, Mukund Nagar, Pune-Satara Road, Swargate, Pune, Maharashtra 411037 (Land Mark :- Opp Laxminarayan Theater)** या परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात येत आहे.

२. सर्व उमेदवारांनी नोंद घेण्यास्तव व्यावसायिक चाचणी लघुलेखन परीक्षेसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती व गुणदान पध्दतीचे स्वरुप यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. सदर परीक्षेबाबतचे प्रवेशपत्र (Admit Card) मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांच्यामार्फत संबंधित उमेदवारांच्या लॉग इन आयडीवर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तरी संबंधित उमेदवारांनी प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेल्या **महत्वाची नोंद व महत्वपुर्ण सुचनेचे** उमेदवारांनी काटेकोरपणे पालन करावे.

४. **लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट-ब अराजपत्रित) आणि लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट-ब अराजपत्रित) या पदांसाठी लघुलेखन चाचणी परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.**

**SCHEDULE OF SKILL TEST SHORTHAND PWD DEPARTMENT**

| Batch No | Batch Date | Reporting Time | Gate Closure Time | Start Time | End Time |
|---|---|---|---|---|---|
| 101 | 13-08-2025 | 07:30 AM | 08:50 AM | 09:00 AM | 10:30 AM |
| 102 | 13-08-2025 | 10:00 AM | 11:20 AM | 11:30 AM | 01:00 PM |
| 103 | 13-08-2025 | 12:30 PM | 01:50 PM | 02:00 PM | 03:30 PM |
| 104 | 13-08-2025 | 03:00 PM | 04:20 PM | 04:30 PM | 06:00 PM |
| 201 | 14-08-2025 | 07:30 AM | 08:50 AM | 09:00 AM | 10:30 AM |
| 202 | 14-08-2025 | 10:00 AM | 11:20 AM | 11:30 AM | 01:00 PM |
| 203 | 14-08-2025 | 12:30 PM | 01:50 PM | 02:00 PM | 03:30 PM |
| 204 | 14-08-2025 | 03:00 PM | 04:20 PM | 04:30 PM | 06:00 PM |

५. **परिक्षा केंद्रावर बायोमेट्रिक व फेस रिडींगद्वारे उमेदवारांची उपस्थिती नोंदविण्याच्या दृष्टीने वरील दिलेल्या वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचा विचार करता येणार नाही कृपया याची नोंद घेण्यात यावी.**

(प्रज्ञा वाळके)
मुख्य अभियंता
सा.बां.प्रादेशिक विभाग, मुंबई तथा
अध्यक्ष राज्यस्तरीय समन्वय समिती

## व्यावसायिक चाचणी लघुलेखन परीक्षेसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती व गुणदान पध्दतीचे प्रारुप

१. गोपनीय संस्थेकडून उच्चश्रेणी लघुलेखक (मराठी व इंग्रजी), निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी व इंग्रजी) आणि लघु टंकलेखक (मराठी व इंग्रजी) या संवर्गासाठी ८० गुणांची संगणक प्रणालीवर आधारित संगणक लघुलेखन चाचणी आयोजित करण्यात येईल. या परीक्षेमध्ये ८० गुणांचा एक गती उतारा (Speed Passage) राहील.

२. **अ)** संगणक लघुलेखन परीक्षा ही, ज्या परीक्षा केंद्रावर संगणक उपलब्ध आहेत, अशा परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. यामध्ये उमेदवारांना सोडवावयाचा गती उतारा (Speed Passage) हा संगणकाच्या माध्यमातून सॉफ्टवेअर द्वारे हेडफोनने ऐकविण्यात येईल.

**ब)** परीक्षा केंद्रावर येताना उमेदवारांनी पेन, पेन्सिल, शार्पनर, Transparent Writing Pad, परीक्षेचे प्रवेश पत्र आणि आधार कार्ड/ पॅन कार्ड/ ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक फोटो ओळखपत्राची मूळ प्रत तसेच दिव्यांग उमेदवार असल्यास दिव्यांगाबाबतचे प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.

**क)** चाचणी दरम्यान खोडरबर (Eraser) वापरण्यास मनाई असल्यामुळे उमेदवारांना परीक्षा केंद्रावर खोडरबर आणता येणार नाही.

**ड)** कर्णबधिर प्रवर्गाचा दावा केलेले दिव्यांग उमेदवार चाचणीसाठी स्वत:चे श्रवणयंत्र घेऊन येऊ शकतात.

३. **अ)** कोणत्याही उमेदवाराला स्वत:चा किवोर्ड आणण्याची परवानगी दिली जाणार नाही.
**ब)** किबोर्डमध्ये कोणताही तांत्रिक बिघाड नसल्यास केवळ उमेदवारांच्या मागणीवरुन कोणत्याही उमेदवारांस कीबोर्ड बदलून मिळणार नाही.
**क)** कीबोर्डमध्ये तांत्रिक बिघाड नसतानाही उमेदवाराने कीबोर्ड बदलून देण्याचा आग्रह केल्यास सदर उमेदवारांचे कृत्य हे परीक्षा आयोजनामध्ये अडथळा समजण्यात येईल व अशा उमेदवारांवर विभागाच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

४. **अ)** एक मिनिटाचा सराव परिच्छेद (Trial Passage) व ४ मिनिटांच्या गती उताऱ्याचे डिक्टेशन (श्रुतलेखन) संगणकावर देण्यात येणार असल्याने प्रत्येक परीक्षा केंद्रावर साधा Auxillary Port असलेला हेडफोन उमेदवारांना संस्थेमार्फत/ परीक्षा केंद्रामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.

**ब)** साध्या हेडफोन व्यतिरिक्त इतर कोणतेही इयरफोन, ब्लूटूथ हेडफोन परीक्षा केंद्रामध्ये आणणाऱ्या उमेदवारास परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही. परीक्षा केंद्रामध्ये कोणत्याही प्रकारचे स्पीकर, रेकॉर्डिंगचे साहित्य चीप किंवा मोबाईल आढळून आल्यास गैरप्रकार या सदरात गृहीत धरण्यात येईल. उमेदवाराने व्यावसायिक चाचणीमध्ये अनुचित मार्ग वापरल्यास सदर उमेदवारास चाचणी परीक्षेसाठी अपात्र ठरविले जाईल व संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

५. मराठी लघुलेखनामध्ये टंकलेखन करताना **ISM-6.2 REMINGTON MARATHI** हा फॉन्ट By Default वापरण्यात येईल व इंग्रजी टंकलेखनासाठी QWERTY किबोर्ड लेआऊट राहील. त्या अनुषंगाने उमेदवारांनी प्रशिक्षित व्हावयाचे आहे.

### परीक्षा सुरु होण्यापूर्वी उमेदवारांनी करावयाच्या आवश्यक कृती :-

६. **अ)** परीक्षेच्या दिवशी उमेदवारांना ४५ मिनिटे आधी परीक्षा केंद्रावर हजर राहणे बंधनकारक राहील. प्रत्येक उमेदवाराने संगणक लॅबमध्ये बसतांना आपल्या बैठक क्रमांकाच्या चढत्या क्रमांकानुसारच बसावयाचे आहे. लॉगिन करण्यापूर्वी उमेदवारांनी कीबोर्ड व माऊस सुस्थितीत असल्याची पूर्णपणे खात्री करुन घ्यावी. कीबोर्ड चाचणीसाठी त्यांना संगणकामधील Notepad सॉफ्टवेअरचा वापर करता येईल, कीबोर्डची चाचणी उमेदवारांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी संगणकावर करुन घ्यावी.

**ब)** उमेदवारांना परीक्षा केंद्रावरील संगणक तंत्रज्ञांकडून Login व Password मिळतील. त संगणकात नोंदवल्यानंतर परीक्षा प्रणालिस सुरुवात होईल. प्रत्यक्षात परीक्षा सुरु झाल्यानंतर म्हणजेच उमेदवारांनी लॉगिन केल्यानंतर उमेदवारांना हेडफोनमधील आवाज व्यवस्थित ऐकू येतो किंवा कसे? याची पडताळणी करण्यासाठी ३० सेकंदाची टेस्ट ऑडिओ (Test Audio) ऐकविण्यात येईल. आवाज व्यवस्थित ऐकू न आल्यास उमेदवारांनी परीक्षा केंद्रावरील तज्ञांशी संपर्क करावयाचा आहे. आवाज व्यवस्थित ऐकू आल्यानंतर, "मला उपलब्ध करुन दिलेले संगणक, कीबोर्ड, माऊस, हेडफोन हे मी तपासले असून ते सुस्थितीत आहेत" असे उमेदवाराने **I AGREE** ☑ यावर टिक करुन प्रमाणित करावयाचे आहे. नंतरच पुढील ट्रायल पॅसेजला पासवर्ड (Controller Password) टाकल्यानंतर परीक्षेची वेळ प्रत्यक्षात सुरु होईल. त्यानंतर सरावासाठी व प्रपाठयवाचकाच्या आवाजाची ओळख व्हावी, यासाठी सर्वप्रथम सराव पॅसेज (Trial Passage) चे श्रुतलेखन (Mock Dictation) देण्यात येईल. हा सराव पॅसेज (Trial Passage) केवळ आणि केवळ प्रपाठयवाचकाच्या आवाजाची ओळख होण्यासाठी असेल.

**क)** ट्रायल पॅसेज हा एक मिनिटाचा असणार आहे. ट्रायल पॅसेजचे श्रुतलेखन (Dictation) घेणे अनिवार्य राहील, मात्र त्याचे Transcription/ Typing (लिप्यंतर) करावयाचे नाही.

**ड) ट्रायल पॅसेजचे** श्रुतलेखन झाल्यानंतर व Outline काढल्यानंतर त्यावर लागलीच पेनाने ☒ काट मारावी, जेणेकरुन उमेदवारांना टंकलेखन करतांना चाचणी उतारा (Trial Passage) आणि वास्तविक उतारा यामध्ये संभ्रम निर्माण होणार नाही.

७. **अ)** ट्रायल पॅसेजचे डिक्टेशन झाल्यानंतर संगणकाच्या स्क्रीनवर १५ सेकंदाचा Countdown येईल व त्यानंतर वास्तविक गती उताराच्या श्रुतलेखनाला (Dictation) सुरुवात करण्यात येईल. परीक्षेला सुरुवात झाल्यानंतर अगोदर गती उताऱ्याचे डिक्टेशन हेडफोन द्वारे सॉफ्टवेअरच्या माध्यमातून ऐकविण्यात येईल.

**ब)** उमेदवारांना, प्रचलित असलेल्या लघुलेखन पुस्तिकेमध्ये (Dictation Notebook ) ज्या रुंदीच्या रेषा असतात, त्या Line Spacing प्रमाणे आखणी केलेल्या उत्तरपत्रिका पुरविण्यात येतील. त्यावर गती उताऱ्याचे Dictation घेतल्यानंतर प्रत्यक्षात संगणकावर लगेचच गती उताऱ्याचे Transcription (लिप्यंतर) टंकलेखन करावयाचे आहे.

**क)** गती उताऱ्यासाठी जी काही निर्धारित वेळ दिलेली असेल, त्या वेळेमध्ये गती उतारा टंकलिखित करावयाचा आहे. उताऱ्याच्या टंकलेखनाची वेळ संपल्यानंतरच SUBMIT बटन कार्यान्वित होईल. SUBMIT बटन न दाबल्यास किंवा राहून गेल्यास गती उतारा आपोआप सबमिट होईल.

**ड)** परीक्षेची वेळ संपल्यानंतर पर्यवेक्षकांच्या परवानगी शिवाय उमेदवारांना परीक्षा हॉल सोडण्याची परवानगी दिली जाणार नाही.

८. लघुलेखनाच्या परीक्षेमध्ये श्रुतलेखन (Dictation) व लिप्यंतर (Transcription) हे संगणकावर होणार आहे. हा मुद्दा लक्षात घेता विषयनिहाय (लघुलेखनाच्या वेगानुसार) परीक्षेचा कालावधी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

अ) लघुलेखक संवर्गाच्या संगणक लघुलेखन चाचणीचा आराखडा:-

| अ.क्र. | संवर्ग | लघुलेखनाचा वेग (शब्द प्रति मिनिट) | शब्द संख्या | डिक्टेशन कालावधी | टंकलेखन कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | उच्च श्रेणी लघुलेखक | 120 | 480 | 4 मिनिटे | 55 मिनिटे |
| 2. | निम्न श्रेणी लघुलेखक | 100 | 400 | 4 मिनिटे | 45 मिनिटे |
| 3. | लघुटंकलेखक | 80 | 320 | 4 मिनिटे | 35 मिनिटे |

**ब)** लघुलेखनाच्या वेगानुसार परीक्षेचा एकूण कालावधी खालीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | भाषा | लघुलेखनाचा वेग (शब्द प्रति मिनिट) | परीक्षा संरचना | परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1. | इंग्रजी/मराठी/ हिंदी | 120 | ट्रायल पॅसेज (1 मिनिट) + काउंट डाऊन (1मिनिट) + वास्तविक श्रुतलेखन (4 मिनिटे) + श्रुतलेखनाचे विश्लेषण करुन टंकलेखन करणे (55 मिनिटे) | 61 मिनिटे (दिव्यांग उमेदवारांसाठी 72 मिनिटे) |
| 2. | इंग्रजी/मराठी/ हिंदी | 100 | ट्रायल पॅसेज (1 मिनिट) + काउंट डाऊन (1मिनिट) + वास्तविक श्रुतलेखन (4 मिनिटे) + श्रुतलेखनाचे विश्लेषण करुन टंकलेखन करणे (45 मिनिटे) | 51 मिनिटे (दिव्यांग उमेदवारांसाठी 61 मिनिटे) |
| 3. | इंग्रजी/मराठी/ हिंदी | 80 | ट्रायल पॅसेज (1 मिनिट) + काउंट डाऊन (1मिनिट) + वास्तविक श्रुतलेखन (4 मिनिटे) + श्रुतलेखनाचे विश्लेषण करुन टंकलेखन करणे (35 मिनिटे) | 41 मिनिटे (दिव्यांग उमेदवारांसाठी 48 मिनिटे) |

९. उपरोक्त आराखडयानुसार प्रस्तुत संवर्गासाठी व्यावसायिक चाचणीचे गुणदान खालीलप्रमाणे असेल.

**अ)** सदर गती उतारा हा ८० गुणांचा असून संगणक लघुलेखन-टंकलेखन व्यावसायिक चाचणीमध्ये पात्र होण्यासाठी उमेदवारांना एकूण किमान ४०% गुण म्हणजेच **किमान ३२ गुण** मिळविणे बंधनकारक राहील.

**ब)** संगणक लघुलेखन व्यावसायिक चाचणी परीक्षेमध्ये उमेदवाराने श्रुतलेखन लघुलिपित करणे **अनिवार्य** आहे. लघुलिपी संकेताकृतीसाठी (Outline) गुण देण्यात येणार नाहीत. मात्र आऊटलाईनसाठी गुण नसले तरी उत्तरपत्रिकेमध्ये आऊटलाईन आढळून न आल्यास किंवा अयोग्य आढळून आल्यास उमेदवाराचे संगणकावरील लिप्यंतर ग्राहय धरले जाणार नाही आणि त्याला गुण दिले जाणार नाहीत, व उमेदवार अपात्र ठरेल.

**क)** परीक्षा संपल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची संकेताकृती काढलेली उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे जमा करुन घेण्यात येतील. पर्यवेक्षकांकडे आल्यानंतर त्याची तज्ञांकडून तपासणी करुन घेण्यात येईल व **त्यामध्ये काही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधित उमेदवारांबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.**

**ड) लिप्यंतरामध्ये २ चुकांसाठी १ गुण कमी करण्यात येईल.** गती उताऱ्यामध्ये जेवढया चुका होतील, उदा. शब्द वगळणे, अतिरिक्त शब्द लिहिणे, शुध्दलेखनातील चुका इत्यांदीसाठी दोन चुकांसाठी एक गुण कमी करण्यात येईल. इंग्रजी गती उताऱ्यामधील Case Sensitivity यामधील चुकांना देखील गुण कमी करण्यात येतील.

**इ)** वाक्यानंतर Full Stop, Comma, Exclamation Mark, Question Mark दिल्यानंतर Space बटनाचा वापर करुन व त्यानंतर पुढील वाक्याला सुरुवात करावी. एक स्पेस (Space) न दिल्यास व पुढील वाक्य लगेचच टंकलिखीत केल्यास चुक धरण्यात येईल.

१० संगणक लघुलेखन परीक्षेमध्ये हेडफोनद्वारे ऐकविलेल्या पॅसेजचे डिक्टेशन (Outline) घेण्यासाठी सर्व उमेदवारांना सर्व विषयांकरिता A4 Size पाठपोट एक पान आखीव उत्तरपत्रिका पुरविण्यात येणार आहे. या उत्तरपत्रिकेवर Pre-printed स्वरुपात बैठक क्रमांक, विषय इत्यादी तपशिल नमूद असेल, अशा प्रकारच्या उत्तरपत्रिका PDF स्वरुपात संबंधित परीक्षा केंद्रावर पुरविण्यात येणार आहेत. आवश्यकतेनुसार उमेदवारांना जर अतिरिक्त पुरवणीची आवश्यकता असेल, तर त्यांना पर्यवेक्षकांकडून आधीच मागून घेता येईल. अतिरिक्त पुरवणी उत्तरपत्रिकेवर मात्र विद्यार्थ्यांना आपला बैठक क्रमांक, विषय इत्यादी माहिती स्वत: भरावी लागेल. आपल्याच नावाच्या/ बैठक क्रमांकाच्या उत्तरपत्रिकेवर विद्यार्थ्यांनी डिक्टेशन (Outline) लिहावयाचे आहे. चुकून दुसऱ्याचे नाव/ बैठक क्रमांक असलेल्या उत्तरपत्रिकेवर डिक्टेशन लिहिल्यास कॉपी प्रकरण समजून त्यावर कारवाई करण्यात येईल याची नोंद सर्व उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

११. अ) परीक्षा सुरु होण्यापूर्वी ५ मिनिटे आधी सर्व उमेदवारांना लघुलेखन उत्तरपत्रिका देण्यात येईल या उत्तरपत्रिकेवर उमेदवारांनी सुरुवातीलाच स्वाक्षरी करावयाची आहे. आणि पर्यवेक्षकांनी विशिष्ट नमूद केलेल्या जागेवर उमेदवारांचे Dictation संपल्यानंतरच स्वाक्षरी करावयाची आहे. **Dictation हेडफोनद्वारे सुरु असतांना कोणत्याही परिस्थितीत पर्यवेक्षकांनी/ केंद्रसंचालकांनी उमेदवारांना व्यत्यय निर्माण होणार नाही याची दक्षता** घ्यावी.

**ब)** गती उताऱ्याचे श्रुतलेखन (Dictation) संपल्यानंतर पुन्हा पर्यवेक्षकांनी उत्तरपत्रिकेवर शेवटी स्वाक्षरी करुन उर्वरित शिल्लक राहिलेल्या कोऱ्या पानावर ✕ अशी फुली मारावयाची आहे. म्हणजेच पर्यवेक्षकांनी डिक्टेशन संपल्यानंतरच संबंधित उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर स्वाक्षरी केल्याची खात्री करावी आणि त्यानंतर उत्तरपत्रिकेच्या सुरुवातीला नमूद केलेल्या जागेवर स्वत:ची स्वाक्षरी करावी व त्याचबरोबर उमेदवाराने ज्या आऊटलाईन काढलेल्या आहेत, त्या संपल्यानंतर देखील पर्यवेक्षकांनी/ केंद्रसंचालकांनी पुन्हा स्वाक्षरी करावयाची आहे.

**क)** उमेदवारांनी देखील स्वत:ची स्वाक्षरी तसेच उत्तरपत्रिकेच्या सुरुवातीला व शेवटी पर्यवेक्षकांनी स्वाक्षरी केल्याची खात्री करावी.

**ड)** उमेदवारांना त्यांची लघुलेखन उत्तरपत्रिका किंवा इतर कोणतेही पृष्ठ परीक्षा हॉलच्या बाहेर नेता येणार नाही.

**इ)** परीक्षा संपल्यानंतर केंद्रसंचालकांनी उमेदवारांच्या आऊटलाईन असलेल्या उत्तरपत्रिका जमा करुन घ्याव्यात. **तसेच परीक्षा संपल्यानंतर सर्व उमेदवांरानी परीक्षेकरीता दिलेले हेडफोन संगणकाला लावलेल्या स्थितीतच ठेवावेत. केंद्रसंचालकांनी देखील सर्व हेडफोन हे प्रत्येक संगणकांसमोर सुस्थितीत असल्याची खात्री करावी व त्यानंतरच उमेदवारांना एका पाठोपाठ एक याप्रमाणे परीक्षा केंद्र सोडण्यास अनुमती दयावी.**

१२. **अ)** कोणताही चुकीचा शब्द दुरुस्त करण्यासाठी बॅकस्पेस कळ (Backspace Key) आणि नेवीगेशन (Arrow) कळ (Key) चा वापर करता येईल.

**ब)** गती उताऱ्याचे डिक्टेशनमध्ये जर अंकांचा उच्चार करण्यात आलेला असेल, तर संगणकामध्ये लिप्यंतर करताना अंकांचाच उल्लेख विद्यार्थ्यांनी करावा. तथापि, याला मात्र काही गोष्टी अपवाद असू शकतात. उदाहरणार्थ १९७० या वर्षाचा विचार झाल्यास साहजिकच तो अंकात लिहावा लागेल. मात्र एक कोटी हा शब्द अंकात न लिहीता "१ कोटी" असाच सर्वसाधारणपणे लिहावयास पाहिजे.

वरीलप्रमाणे परीक्षेची कार्यपध्दती व गुणदान योजना असेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.